प्रेसनोट –

**रुममेट सोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन त्यांचे लॅपटॉप व कॅमेरा चोरणारा चोरटा भारती विद्यापीठ पोलीसांच्या जाळ्यात**

---

दिंनाक २२/०१/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते व तपास पथकातील कर्मचारी हे चोरीच्या गुन्ह्यास प्रतिबंध करणेकरीता पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील कर्मचारी सर्फराज देशमुख यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, एक मुलगा अंगात भगव्या रंगाचे टिशर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला व त्याच्या मागे काळया रंगाची सॅक लावलेला साधारण १८ ते २२ वर्षाचा दत्तनगर सर्विस रोडवर लॅपटॉप विक्री करीता येणार आहे अशी बातमी मिळाली त्याप्रमाणे सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन लॅपटॉप विक्रीस आलेल्या ओंकार बबन ढगे वय २० रा ओम सिध्दीबिल्डींग चंद्रभागा नगर रोहीतवडेवाले जवळ आंबेगाव बु. पुणे मुळ गाव मु पो शिरोली ता जुन्नर जि पुणे यास पकडण्यात आले त्याच्याकडे अधिक तपास करता त्यांनी सदरचे लॅपटॉप हे त्याचे सोबत राहणारे त्याचे रुम पार्टनर यांचेच चोरल्याचे निष्पन्न झाले आहे सदर लॅपटॉप चोरी बाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाणेस गु र नं ४१/१८ भादवि कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यात त्याला अटक करुन त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन त्याचेकडुन १. चायनिज कपनीचा लॅपटॉप २. व्हिवो कपंनीचा लॅपटाप ३. कॅनन कंपनीचा कॅमेरा व कॅनन कपनीचे लेन्स असा एकुण १,३०,०००/- रु किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपी यांनी अश्याप्रकारे आणखीन काही गुन्हे केले आहेत का याबाबत तपास चालु आहे.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंडे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते, कर्मचारी कृष्णा निढाळकर, प्रणव संकपाळ, अमोल पवार, सरफराज देशमुख, उज्वल मोकाशी, कुंदन शिदे, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, गणेश चिंचकर,शिवदत्त गायकवाड यांनी केलेली आहे तपास पोलीस हवालदार कृष्णा निढाळकर भारती विदयापिठ पोलीस स्टेशन पुणे करीत आहेत.